
# Cosmos Multidisciplinary Research E-Journal

Recognized International Indexed & Peer Reviewed Journal

ISSN 2456-1665

IMPACT FACTOR 4.94

VOLUME VI | ISSUE VI | JUNE 2021



PRINCIPAL
Sonopant Dandekar Arts College
V. S. Apte Commerce College &
M. H. Mehta Science College
Palghar (W.R.)
Dist. Palghar. Pin 401 404

Prof. Dr. Gajhans D.S.
*Chief Editor*

Dr. Tukaram Gajar
*Executive Editor & Publisher*

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Review Journal
IMPACT FACTOR 4.94
ISSN No. 2456-1665



| Sr. No. | Title of article | Author / Researcher | Page No. |
|---|---|---|---|
| 22 | स्वामी विवेकानंदांच्या विचारांचे राष्ट्र उभारणीतील योगदान | राजकुमार विठ्ठल कडव | 91-95 |
| 23 | जालना जिल्ह्यातील लोकसंख्या घनतेचा भौगोलीक अभ्यास | प्रा.डॉ.सोमीनाथ सारंगधर खाडे<br>श्री मनोज मधुराज डोईफोडे | 96-98 |
| 24 | मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येला जबाबदार घटक | महेश प्रतापराव गोळेकर | 99-102 |
| 25 | निवडणुक प्रक्रियेत जनमत चाचण्याची पारदर्शकता | अजितकुमार महादेव शिंदे | 103-107 |
| 26 | धम्मचक्र प्रवर्तन धर्मांतर आणि अशोक विजयादशमी | शरद गंगाधरराव कवानकर | 108-111 |
| 27 | Mental Health of Offenders Women & Normal Women | Bhadane Ashok Namdeo | 112-115 |
| 28 | White Hat Hackers and Ethical Hacking | Rahul Laxmikant Gajre | 116-121 |
| 29 | A Study of Demographic Features in Hingoli District | Dhorkule Y.V. | 122-124 |
| 30 | कोरोना संक्रमण काळातील 'ग्रंथ आपल्या दारी' या दांडेकर महाविद्यालयाच्या रा.ही. सावे ग्रंथालयाच्या योजनेचा समिक्षात्मक अभ्यास | प्रा. डॉ. शीला गोडबोले पाईकराव | 125-131 |



PRINCIPAL
Sonopant Dandekar Arts College
V. S. Apte Commerce College &
M. H. Mehta Science College
Palghar (W.R.)
Dist. Palghar Pin 401 404.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# कोरोना संक्रमण काळातील ''ग्रंथ आपल्या दारी'' या दांडेकर महाविद्यालयाच्या रा. ही. सावे ग्रंथालयाच्या योजनेचा समिक्षात्मक अभ्यास

**प्रा. डॉ. शीला गोडबोले पाईकराव**
ग्रंथपाल
सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर

**प्रास्ताविक :**

कोरोना (Covid – 19) विषाणूने संपूर्ण जगभर थैमान घातले प्रचंड गतीने हा विषाणू चीनमधून जगभर पासरला. मानव त्यांसी संबंधित सर्वच क्षेत्रावर याचा परिणाम दिसून आला. लाखो लोक मृत्युमुखी पडले आणि सामाजिक, आर्थिक, व मानवी आरोग्यावर याचा प्रचंड परीणाम झाला. भारतात कोरोनाचा पहिला रूग्ण २० वर्षीय महिला केरळ मध्ये दि. २७ जानेवारी २०२० रोजी सापडला. रूग्णसंख्या व संक्रमण वाढते आहे. हे ध्यानात घेऊन भारत सरकारने पूर्ण देशभर लॉकडाऊन घोषित केला. संक्रमण व प्रादूर्भाव टाळण्यासाठी सरकारला लॉकडाऊनची मुदत वेळोवेळी वाढवावी लागली. बऱ्याच वेळा संचारबंदी लावावी लागली. त्यामुळे अनेक लोकांचे प्रचंड हाल झाले. अनेक उद्योग, कारखाने, सेवा क्षेत्रातील नोकऱ्या नष्ट झाल्या. देशाची अर्थव्यवस्था खुप खालच्या स्तरावर आली. या विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे अनेक सामाजिक, आर्थिक, आरोग्यविषयक समस्या निर्माण झाल्या. दिर्घकाळ बंद असलेले उद्योग व्यवसायामुळे अनेक कौटुंबिक व सामाजिक समस्याही निर्माण झाल्या. या सर्वाचा परीणाम शिक्षण क्षेत्रावरही झाला शिक्षण क्षेत्रातही खुप गंभीर परीणाम दिसून आले. विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान झाले. कॉलेज, शाळा किंवा शिक्षण क्षेत्रातील व्यवसाय शिक्षण, वैद्यकीय, शेती शिक्षण देणाऱ्या सर्वच शिक्षण संस्था दिर्घकाळ बंद झाल्यामुळे विद्यार्थ्याचे पर्यायाने समाज व देशाचे नुकसान झाले आहे. दरम्यानच्या काळात अनेक शिक्षण संस्थांनी Online शिक्षण देण्याचे प्रयोग केले ते आजही सुरूच आहेत मात्र ग्रामिण व शहरी गरीब विद्यार्थ्यांना अशा प्रकारचे शिक्षण पोहचविण्यासाठी अनेक अडचणी निर्माण झाल्या.

ग्रामीण व गरीब विद्यार्थ्याकडे असणारा Smart Phone चा अभाव तसेच Internet उपलब्धतेत असणारी अनियमितता व विद्यार्थी व विषयतज्ञांमध्ये असणारा समन्वय सुचना अभाव यामुळे या प्रकारच्या माध्यमात अनंत अडचणी आल्या आहेत. कोरोना काळात विद्यार्थ्याकडे वाचन साहित्याचा असणारा अभाव हे देखील महत्त्वाचे कारण होते. पालघर जिल्हा हा आदिवासी बहुल जिल्हा आहे. या जिल्ह्यातील बहुतांश महाविद्यालयीन विद्यार्थ ग्रामिण व दुर्गम (Remote) भागात राहातात. महाविद्यालये व ग्रंथालये बंद असल्यामुळे विद्यार्थ्याच्या शिक्षणप्रक्रियेत अनंत अडचणी निर्माण झाल्या. वाचन साहित्याचा अभाव, वर्गशिक्षणाचा अभाव तसेच आर्थिक अडचणीमुळे Smart Phones व Internet Service चा अभाव व अनियमितता यामुळे ग्रामीण भागातील सामान्य तसेच गरिब व आदिवासी विद्यार्थ्याच्या ज्ञानार्जनातील सातत्याचा प्रश्न निर्माण झाला.

पालघर शहर, पालघर जिल्ह्यातील, तालुक्याची ठिकाणे व उर्वरित ग्रामीण भागातही कोराना रूग्णांची वाढती संख्या लक्षात घेऊन कोरोना संक्रमणांचे सर्व शासकीय आरशे, नियमावली व बंधने लागु करण्यात आली. सामाजिक अंतर पाळणे बंधनकारक करण्यात आल्यामुळे सुरूवातीच्या काळात जिल्ह्यात सर्वत्र आपतकालीन सेवा व त्यातील संलग्न लोक वगळता इतरांच्या संचारावर बंधने घालण्यात आली. शाळा, महाविद्यालये, वाहतुक, सार्वजनिक वाहतुक व्यवस्था बंदच होती. त्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्याच्या संचारावरही बंधने आली. पालघर परीसरातील सर्वात जूने व मोठे असणारे दांडेकर महाविद्यालय जे (पालघर महाविद्यालय) नावानेही पूर्वीपासून ओळखले जाते तेथील ज्ञानदान व ग्रंथालय सेवा कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे बंद होती. या महाविद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी हे ग्रामिण व आदिवासी समुहातून येतात. त्यामुळे त्यांच्या ज्ञानार्जन प्रक्रियेवर कोरोनाचा प्रचंड प्रभाव झाला. मध्यंतरीच्या काळात शासनाने काही बंधने शिथिल केली व सार्वजनिक वाहतूक व्यवस्था काही अंशी सुरु केली. मात्र शाळा, महाविद्यालये बंदच होती. ग्रंथालय सुद्धा बंद असल्याकारणाने विद्यार्थ्यांना होणारी ग्रंथ व वाचन साहित्याची देवघेव बंद होती. वाचन साहित्य

PRINCIPAL
Sonopant Dandekar Arts College
V. S. Apte Commerce College &
M. H. Mehta Science College
Palghar (W.R.)
Dist. Palghar Pin 401 404

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

नाही व विषयांची व्याख्याने नसल्यामुळे विद्यार्थ्यांना अनेक अडचणी निर्माण झाल्या. दरम्यानच्या काळात व्दसपदम रबजनतक घ्यायला बऱ्याच प्राध्यापकांनी प्रारंभ केला मात्र वाचनसाहीत्य नसल्यामुळे आकलन व ज्ञानार्जनात अनेक अडचणी निर्माण होत होत्या. विद्यार्थ्यांना कोरोना संक्रमण काळातही वाचनसाहीत्य मिळालेच पाहीजे. व्याख्यानासमवेत विद्यार्थ्यांना वाचनसाहीत्य उपलब्ध नसेल तर ज्ञानार्जनाची प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही त्यामुळे विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेऊन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरण सावे, समन्वयक प्रर्यवेक्षक प्रा. महेश देशमुख व महाविद्यालयाच्या ग्रंथपाल प्रा. डॉ. शीला गोडबोले पाईकराव यांच्या संकल्पनेतून व समन्वयातून 'ग्रंथ आपल्या दारी' ही योजना आकाराला आली व अत्यंत कमी वेळात नियोजन करुन ग्रंथालयीन कर्मचायांच्या मदतीने या प्रकल्पाची सुरुवात करण्यात आली.

**काय आहे या योजनेचे स्वरूप? :**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना असणारी ग्रंथ व वाचनसाहित्याची गरज लक्षात घेऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यापर्यत पोहचविण्याचा संकल्प व उद्दिष्ट ठरविण्यात आले. महाविद्यालयाचे विद्यार्थी ज्या गावात रहातात त्या गावात जाऊन त्यांना घरपोच सेवा देणे हे या प्रकल्पाचे महत्वाचे उद्दिष्ट होते. तद्वतच ग्रामीण भागातील जास्तीत जास्त सामान्य वाचकांना ग्रंथालयासी जोडणे हे ही महत्त्वाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले.

**योजनेचा लाभ देण्यात येणारे घटक :**

१. ग्रामीण भागातील महाविद्यालयाचे विद्यार्थी
२. ग्रामीण भागातील वाचनाची आवड असणारे वाचक

**योजनेचे लाभार्थी :**

विद्यार्थी व ग्रामीण भागातील सामान्य वाचक हे या योजनेचे मुख्य लाभार्थी ठरविण्यात आले. सार्वजनिक वाहतुक व्यवस्था बंद असल्यामुळे तसेच सार्वजनिक संचारावर बंधने असल्यामुळे तसेच ग्रंथालयीन सेवा बंद असल्यामुळे विद्यार्थी हा केंद्रभुत घटक व लाभार्थी ठरविण्यात आला. विद्यार्थ्यांना त्यांच्या घरीच आवश्यक ग्रंथ व वाचनसाहित्य उपलब्ध झाल्यामुळे त्यांची वाचनसाहित्याची अडचण दूर झाली. ग्रामीण भागात कोरोना काळात अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. ग्रामीण भागातील सामान्य वाचकांना त्यांच्या घरीच वाचन आवडीनुसार ग्रंथ उपलब्ध झाल्यामुळे ग्रामीण भागातील मुक्त संचारांवर आपाआपच बंधने आली. किंवहुना आवश्यक वाचन साहित्य मिळाल्यामुळे व वर्तनमापनाची ही उपलब्धता नसतांना ही पर्वणीच ठरली. ग्रामीण भागातील सार्वजनिक वाचनालयाचे पूर्णपणे बंद असल्यामुळे शिवाय वर्तमानपत्रे नसल्यामुळे वाचकांना 'ग्रंथ आपुल्या दारी' या योजनेचा खुप फायदा झाला व प्रत्यक्षपणे घरी थांबून त्यांनी राष्ट्रीय कार्याला त्यांनी मदतच केली.

**योजनेचे क्रियान्वयन :**

योजनेच्या क्रियान्वयनासाठी कर्मचाऱ्यांची नवड केली. जे स्वत: ग्रामीण भागात राहतात. प्रत्येकाला दर १०० पुस्तके देण्यात आली. त्या सोबतच त्या पुस्तकांची रेकॉर्ड वही देवाणघेवाण नोंद वही देण्यात आली. त्यांनी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याला घरी जाऊन त्यांनी मागेल ते वाचनयाहित्य द्यावे ८ दिवसांकरीता. त्या विद्यार्थ्याने पुन्हा ८ दिवसांनी ते पुस्तक घ्यावे अशा पद्धतीने विद्यार्थ्यांची वाचनाची गरज भागविण्यात आली व त्यांची शिक्षण व अभ्यासापासून नाळ तुटू दिली गेली नाही. विद्यार्थ्यांना या योजनेचा खुप फायदा झाला. याशिवाय ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी त्या त्या गावातील वाचनाची आवड जपण्यासाठी कथा, कांदबरी, नाटके, तात्वीक ग्रंथ, चरित्रे काव्यसंग्रह असे वाचनाचे विविध प्रकार त्यांच्यापर्यत पोहचविले गेले. या निमित्ताने रा. ही. सावे ग्रंथालय व ग्रंथालयातील समृद्ध ग्रंथसंग्रहाचा फायदा ग्रामीण भागातील चोखंदळ वाचकांना झाला. याशिवाय ग्रंथ विकत घेण्याची ऐपत नसणाऱ्या वाचकांचाही फायदा झाला. ते ग्रंथालयासी जोडले गेले. याशिवाय विद्यार्थ्यासमवेत ग्रंथालयातील १ लाखाच्या वर असणाऱ्या ग्रंथसंपदेला वाचक मिळाला. प्रत्येक वाचकाला त्याचा ग्रंथ मिळावा व प्रत्येक ग्रंथाला वाचक मिळावा हे भारतीय ग्रंथालय शास्त्राचे पितामह असणाऱ्या डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे सुत्र येथे खऱ्या अर्थाने सिद्ध झाले.

**'ग्रंथ आपुल्या दारी' या योजनेत समाविष्ट गावे (परिशिष्ट) :**

१. केळवा
२. माहिम
३. शिरगाव
४. सातपाटी
५. मासवण

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

६. निहे
७. लोहरे
८. नागझरी
९. खरशेत
१०. वांदीवले
११. काटाळे

**'ग्रंथ आपुल्या दारी' योजनेत एकूण कार्यकर्ते (परिशिष्ट) :**

१. श्री. महेश केशव वर्तक
२. श्री. संजय दिगंबर परब
३. भावेश बाळकृष्ण राऊत
४. रोशन रविंद्र पाटील
५. दिनेश जनार्दन पाटील
६. सुनिल देविदास पवार
७. मनिष प्रदिप पाटील

**'ग्रंथ आपुल्या दारी' योजनेअंतर्गत वाटप ग्रंथाचे प्रकार व एकूण संख्या :**

| अनु. क्र. | ग्रंथांचे प्रकार | एकूण ग्रंथ |
|---|---|---|
| १ | कथा | ९३ |
| २ | कथासंग्रह | २२ |
| ३ | कादंबरी | १४० |
| ४ | चरित्र | ११५ |
| ५ | आत्मचरित्र | १८ |
| ६ | स्त्री चरित्र | ३८ |
| ७ | लोकसाहीत्य | ५ |
| ८ | नाटक | १५ |
| ९ | संकिर्ण लेखन | ८ |
| १० | भाषणे | ३ |
| ११ | वर्णन | १५ |
| १२ | प्रेरणादाय | १० |
| १३ | प्रसार माध्यम | १ |
| १४ | लेख | १७ |
| १५ | लेखसंग्रह | १४ |
| १६ | इतिहास | ९ |
| १७ | मानसशास्त्र | ७ |
| १८ | व्याकरण | ३ |
| १९ | क्रिडा | ५ |
| २० | शरीर विज्ञान | १ |
| २१ | आहार सुरक्षा | ५ |
| २२ | कविता | ३ |
| २३ | सामाजिक चळवळी | २ |
| २४ | धर्म | ५ |
| २५ | कृषी विज्ञान | २ |
| २६ | स्त्री आरोग्य | ३ |
| २७ | तत्वज्ञान | ३ |
| २८ | तंत्रज्ञान | १ |
| | एकूण | ५६४ |

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

**गावानुसार पुस्तक वाटप संख्या:** एकूण दहा गावांपैकी कोणत्या गावात जास्त पुस्तके वाटप झाले आहे हे स्पष्ठ होते.

| अनु. क्र. | गावाचे नाव | एकूण ग्रंथ संख्या |
|---|---|---|
| १ | केळवा | १२६ |
| २ | शिरगाव | १०८ |
| ३ | निहे | ७३ |
| ४ | लोवरे | ७१ |
| ५ | मासवन | ६१ |
| ६ | खरशेत | ४५ |
| ७ | नागझरी | ३१ |
| ८ | वांदीवली | २४ |
| ९ | माहीम | १३ |
| १० | काटाळे | ०९ |
| ११ | बहाडोली | ०३ |

**वाचक श्रेणी:** सर्वात जास्त वेळेस ग्रंथ वाचणारा वाचक खालील तक्त्याद्वारे दाखविण्यात आला आला आहे.

| अनु. क्र. | वाचकांचे नाव | ग्रंथ वाचन क्रं. |
|---|---|---|
| १ | श्रेया पाटील | ६ |
| २ | स्मिता पाटील | ६ |
| ३ | धनेशभाई वर्तक | ५ |
| ४ | शुभदा सं. माने | ५ |
| ५ | अशोक मोरे | ५ |
| ६ | वैभवी पाटील | ५ |
| ७ | आर्या पाटील | ४ |
| ८ | जयेश चुरी | ४ |
| ९ | नितिन भोईर | ४ |
| १० | चिन्मय पाटील | ४ |
| ११ | आचल पाटील | ४ |
| १२ | रिना घरत | ४ |
| १३ | प्रिती नि. घरत | ४ |
| १४ | अल्पेश पाटील | ३ |
| १५ | उन्नती पाटील | ३ |
| १६ | चिन्मय पाटील | ३ |
| १७ | समृद्धी पाटील | ३ |
| १८ | इशा पाटील | ३ |
| १९ | आर्या पाटील | ३ |
| २० | आचल पाटील | ३ |
| २१ | विवेक पाटील | ३ |
| २२ | निरंजन ज. पाटील | ३ |
| २३ | चंद्रकांत ज. राऊत | ३ |
| २४ | प्रदीप हरीश्चंद्र ठाकूर | ३ |
| २५ | श्रुती पाटील | ३ |
| २६ | ध्रुवेश पाटील | ३ |
| २७ | हेमंत पाटील | ३ |

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

| अनु. क्र. | वाचकांचे नाव | ग्रंथ वाचन क्रं. |
|---|---|---|
| २८ | अपर्णा पाटील | ३ |
| २९ | वैष्णव बी. अधिकारी | २ |
| ३० | गुरुनाथ अ. अधिकारी | २ |
| ३१ | वैशाली बी. अधिकारी | २ |
| ३२ | प्रिया पाटील | २ |
| ३३ | कांचन पाटील | २ |
| ३४ | श्रेया विश्वास पाटील | २ |
| ३५ | कौशीक सी. पाटील | २ |
| ३६ | अक्षय पाटील | २ |
| ३७ | सिद्धी पाटील | २ |
| ३८ | उत्तेज पाटील | २ |
| ३९ | भाविका हेमंत पाटील | २ |
| ४० | दिप्ती डी. पाटील | २ |
| ४१ | इशा पाटील | २ |
| ४२ | आचल पाटील | २ |
| ४३ | प्राची पाटील | २ |
| ४४ | अनिल अधिकारी | २ |
| ४५ | अशोक पाटील | २ |
| ४६ | नारायण अधिकारी | २ |
| ४७ | अल्पेश पाटील | २ |
| ४८ | जानवी पाटील | २ |
| ४९ | वर्षा पाटील | २ |
| ५० | मनोज पाटील | २ |

**ग्रंथ श्रेणी:** खालील तक्त्यात सर्वात जास्त मागणी असणाऱ्या पुस्तकांचा क्रमांक दाखविण्यात आला आहे.

| अनु. क्र. | ग्रंथांचे नाव | एकूण ग्रंथ |
|---|---|---|
| १ | मन मे हें विश्वास | ८ |
| २ | मृत्युंजय | ७ |
| ३ | फाईव्ह पॉईंट समन्वय | ७ |
| ४ | शाळा | ६ |
| ५ | स्वामी विवेकानंद | ६ |
| ६ | माझी जीवनयात्रा | ५ |
| ७ | सावित्रीचा निर्णय | ५ |
| ८ | स्वामी | ५ |
| ९ | सुनिता विल्यम्स | ५ |
| १० | गोष्टी माणसांच्या | ५ |
| ११ | बेरड | ४ |
| १२ | चिमणराचाचे चऱ्हाट | ४ |
| १३ | फिरस्ती | ४ |
| १४ | निवडक मराठी कथा | ४ |
| १५ | पारध्याचं जीणं | ४ |
| १६ | सम्राट अशोक चरित्र | ४ |
| १७ | स्वर्गाच्या वाटेवर काहितरी घडलं | ४ |

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

| अनु. क्र. | ग्रंथांचे नाव | एकूण ग्रंथ |
|---|---|---|
| १८ | वन नाईट द कॉल सेंटर | ४ |
| १९ | नटसम्राट | ४ |
| २० | यांनी घडवला भारत | ३ |
| २१ | बंध - अनुबंध | ३ |
| २२ | बराक ओबामा | ३ |
| २३ | बोक्या सात बंडे | ३ |
| २४ | महान जीवन जगण्याची कला | ३ |
| २५ | माझी लाडकी पूतना मावश | ३ |
| २६ | मैत्र | ३ |
| २७ | मन धुकेत रमलं | ३ |
| २८ | क्षितीज | ३ |
| २९ | पिकली पानं | ३ |
| ३० | शिकार | ३ |
| ३१ | विवेकानंद जीवन चरित्र | ३ |
| ३२ | विटाळ | ३ |
| ३३ | भोवळ | ३ |
| ३४ | पावन खिंड | ३ |
| ३५ | पडघवली | ३ |
| ३६ | राजर्षी शाहू छत्रपती | ३ |
| ३७ | राजा शिवछत्रपती | ३ |
| ३८ | छावा | ३ |
| ३९ | जगायचं प्रत्येक सेकंद | ३ |
| ४० | नटरंग | ३ |
| ४१ | आधुनिक महाराष्ट्र | ३ |
| ४२ | अफवा खरी ठरावी म्हणून | ३ |
| ४३ | गोष्टी तुमच्या माझ्या | ३ |
| ४४ | युगंधर | २ |
| ४५ | खरेखुरे आयडॉल | २ |
| ४६ | ऋणानुबंध | २ |
| ४७ | शाहुंच्या आठवणी | २ |
| ४८ | शाहू | २ |
| ४९ | बाबा आमटे | २ |
| ५० | बनगरवाडी | २ |
| ५१ | कृष्णविवर | २ |
| ५२ | कृष्णजन्म | २ |
| ५३ | कांदाचिर | २ |
| ५४ | काही अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रे | २ |
| ५५ | कावळयांची शाळा | २ |
| ५६ | महाराणी लक्ष्मीबाई साहेब | २ |
| ५७ | मी मलाला | २ |
| ५८ | मराठा मुलगी | २ |
| ५९ | माझा देश माझी माणसं | २ |
| ६० | माझ्या आयुष्याची पानं | २ |

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

| अनु. क्र. | ग्रंथांचे नाव | एकूण ग्रंथ |
|---|---|---|
| ६१ | मुंबई ऑन सेल | २ |
| ६२ | मुठीतले आकाश | २ |
| ६३ | मुळ व्याकरण | २ |
| ६४ | त्रिशंकू | २ |
| ६५ | क्रिडा स्पर्धा नियोजन | २ |
| ६६ | हिंदोका | २ |
| ६७ | भिरुड | २ |
| ६८ | थैलीभर गोष्टी | २ |
| ६९ | विनोद गाथा | २ |
| ७० | फिनिक्सच्या राखेतुन उठला मोर | २ |
| ७१ | हसवणुक | २ |
| ७२ | हे राम | २ |
| ७३ | परीपूर्ती | २ |
| ७४ | पारखा | २ |
| ७५ | पानीपत | २ |
| ७६ | पुण्याची प्रभात | २ |
| ७८ | रणांगण | २ |
| ७९ | रयतेचा राजा शिवछत्रपती | २ |
| ८० | श्रीमान योगी | २ |
| ८१ | रायगडाला जेव्हा जाग येते | २ |
| ८२ | रात्र | २ |
| ८३ | राहिच्या स्वप्नांचा उलगडा | २ |
| ८४ | रानसय | २ |
| ८५ | संभाजी | २ |
| ८६ | सर्पाचा सुड | २ |
| ८७ | सावित्रीबाई फुले | २ |
| ८८ | डोंगरा साठी काही फुले | २ |
| ८९ | डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र | २ |

**निष्कर्ष :**

अत्यंत अभिनव असणारी व कोरोना (Covid – 19) संक्रमण काळात विद्यार्थी व वाचकांच्या दारात जाऊन त्यांना आवश्यक वाचन साहित्याची उपलब्धता अत्यंत यशस्वीपणे करणारी ही योजना खऱ्या अर्थाने उपयुक्त सिद्ध झाली. घराच्या बाहेर पडू न शकणाऱ्या व वाचन तसेच येणाऱ्या परीक्षेसाठी तयारी करण्यासाठी इतर कोणतेच माध्यम नसतांना ही योजना महाविद्यालयाच्या गावातील विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरली आहे. घोषित शासन पुरुस्कृत संचारबंदी काळात या योजनेने खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या अभ्यासात सातत्य ठेवले आहे. तसेच ग्रामीण भागातील वाचकांची वाचनाची आवड जोपासली जाऊन त्यांचे मानसिक स्थैर्य राखण्यास बऱ्याच अंशी मदत झाली आहे.